बंजारा शिक्षण संस्था द्वारा संचलित

# कै.बापूसाहेब पाटील एकंबेकर महाविद्यालय, हनेगाव ता.देगलूर जि.नांदेड



# लोकसभेची रचना

डॉ.मानवते उत्तम हुसनाजी

प्राध्यापक व राज्यशास्त्र विभागप्रमुख

भारताच्या केंद्रीय कायदेमंडळाला संसद म्हणतात. भारताची संसद ही द्विगृही आहे. वरिष्ठ सभागृहाला राज्यसभा म्हणतात तर कनिष्ठ सभाग्रुहाला लोकसभा म्हणतात. राज्यघटनेच्या कलम ७९ मध्ये असे स्पष्ट करण्यात आले आहे कि, संघराज्यासाठी एक संसद असेल ती राष्ट्रपती, राज्यसभा व लोकसभा यांनी मिळून बनलेली असेल. कायदेमंडळाचे कार्य कायदे तयार करणे हे आहे. कायदेमंडळाने तयार केलेल्या कायद्यास राष्ट्रपतीची सहमती आवश्यक असते. राष्ट्रपती जोपर्यंत कोणत्याही कायद्यास सहमती देत नाहीत तोपर्यंत कोणत्याही विधेयकाचे कायद्यात रुपांतर होत नाही.

# लोकसभा

लोकसभा हे संसदेचे पहिले व कनिष्ठ सभागृह आहे. हे सभागृह लोकांचे प्रतिनिधित्व करते. लोकसभेचा शब्दशः अर्थ लोकांचे सभागृह असे आहे. लोकसभा हे संसदेचे कनिष्ठ सभागृह असले तरी ते अधिकाराने मात्र वरिष्ठ आहे. राज्यसभेपेक्षा खूप जास्त अधिकार विशेष करून आर्थिक बाबतीतले अधिकार लोकसभेला प्राप्त झाले आहेत.

# रचना

## 1. सभासद संख्या

भारतीय राज्यघटनेच्या कलम ८१ मध्ये लोकसभेची सदस्य संख्या सांगितली आहे. लोकसभा जेंव्हा अस्तित्वात आली तेंव्हा तिची संख्या ५०० एवढी होती. १९५६ च्या ७ व्या घटना दुरुस्तीने लोकसभेत घटक राज्यांचे ५०० प्रतिनिधी केंद्रशासित प्रदेशांची २० प्रतिनिधी अशी ही संख्या ५२० आली. १९६२ मध्ये १४ व्या घटनादुरुस्तीने ही संख्या ५२५ करण्यात आली . तर १९७४ मध्ये ३१ व्या घटनादुरुस्तीने घटक राज्यांचे ५२५ केंद्रशासित प्रदेशाचे २० असे मिळून ५४५ ही सदस्य संख्या करण्यात आली आहे. अंग्लो-इंडिअन समाजाला लोकसभेत जर प्रतिनिधित्व मिळाळे नसल्यास त्यामाजाचे दोन प्रतिनिधी राष्ट्रपती लोकसभेत नियुक्त करतात. ही सदस्य संख्या २०२६ पर्यंत राहणार आहे.

## 2. प्रतिनिधित्व-

लोकसभेत सर्व घटक राज्यांना समान प्रमाणात प्रतिनिधित्व दिले जाईल असे स्पष्ट करण्यात आले आहे. प्रत्येक घातक राज्यातून कमीत कमी एक प्रतिनिधी लोकसभेत पाठवला जातो. १९७१ च्या जनगणने नुसार मतदार संघ तयार करण्यात आले आहे.10 ते 12 लाख लोकसंख्येसाठी १ प्रतिनिधी पाठवला जातो. प्रत्यक्षात गुप्त मतदान पद्धतीने मतदान होऊन मतदार संघात सर्वात जास्त मते घेणारा उमेदवार विजयी घोषित केला जातो.

## 3. राखीव जागांचे प्रमाण-

लोकसभेत अनुसूचित जाती जमातींना काही जागा राखीव ठेवण्यात आले आहे. त्यानुसार ५४५ सदस्यांपैकी ८५ जागा अनुसूचित जातींसाठी तर ४७ जागा अनुसूचित जमातींसाठी राखीव ठेवण्यात आल्या आहेत.

## 4. सदस्यांची पात्रता –

राज्यघटनेच्या कलम ८४ मध्ये लोकसभेच्या सदस्यत्वासाठी खालील प्रमाणे पात्रता सांगितले आहे

* तो भारताचा नागरिक असावा.
* त्याने वयाची 25 वर्षे पूर्ण केलेली असावीत.
* तो लोकसभेने वेळोवेळी तयार केलेल्या अटी पूर्ण करणारा असावा.

## 5. कार्यकाल

सर्व साधारणपणे लोकसभेचा कार्यकाळ 5 वर्षाचा आहे. ४२ घटना दुरुस्तीने लोकसभेचा कार्यकाळ 6 वर्षे करण्यात आला होता. पुन्हा ४४ व्या घटना दुरुस्तीने पुन्हा तो 5 वर्षांचा करण्यात आला आहे. हा कार्यकाल संपण्यापूर्वी पंतप्रधानांच्या सल्याने राष्ट्रपती लोकसभा विसर्जित करू शकतात.

## 6. लोकसभेची अधिवेशने

राज्यघटनेच्या कलम ८५ नुसार राष्ट्रपती लोकसभेचे अधिवेशन केंव्हाही बोलावू शकतात. हा अधिकार राष्ट्रपती पंतप्रधानाच्या सल्याने वापरतात. १ ल्या अधिवेशनाच्या पहिला दिवस व दुसऱ्या अधिवेशनाचा पहिला दिवस यामध्ये अंतर 6 महिन्यापेक्षा जास्त असू नये .

## 7. गण संख्या

लोकसभेचे कामकाज सुरु होण्यसाठी जी सदस्य संख्या आवश्यक असते तिला गण संख्या असे म्हणतात.

लोकसभेचे कामकाज चालू करण्याठी एकूण सदस्य संख्या 1/10 सभासद उपस्थित राहणे आवश्यक आहे. लोकसभेची सदस्य संख्या 543 आहे. याचा अर्थ लोकसभेचे कामकाज चालू करण्यासाठी एकूण 55 सदस्य उपस्थित राहणे आवश्यक आहे.

## 8. लोकसभेचे पदाधिकारी-

राज्यघटनेच्या कलम 93-97 मध्ये लोकसभेचे सभापती व उपसभापती च्या संदर्भात तरतुदी केल्या आहेत. लोकसभेच्या सार्वत्रिक निवडणुकीनतर पहिल्याच बैठकीमध्ये या  दोन्ही पदाधिकाऱ्यांची निवड केली जाते. लोकसभेच्या सदस्यांपैकी एकाची सभापत्ती म्हणून निवड केली जाते किंवा  बिनविरोध निवड केली जाते. लोकसभेत सत्ताधारी पक्षाचे बहुमत असल्याने सभापती पद हे सताधारी पक्षांकडेच जाते कधी कधी विरोधी पक्षाकडे उपसभापती पद दिले जाते. या दोघांशिवाय सभापती नेमण्याचे एक सभापती मंडळ असते, या ध्ये 7 सदस्य असतात. सभापती व उपसभापती गैरहजर असल्यास मंडळातील 7 जणांपैकी जो ज्येष्ठ असेल तो सभापती बनतो. ह्या 7 जणांपैकी 7 हि जण गैरहजर असतील तर   सभागृहातील ज्येष्ठ सभासदाला तात्पुरते सभापती नेमले जाते  व सभागृहाचे कामकाज चालू केले जाते.


धन्यवाद!